नाव :- कु. वडवणीकर अक्षता दत्तात्रय

पत्ता :- वेदांत नगर, दत्त मंदिर शेजारी (प्लॉट नं. ४३)
सावेडी रोड, अहमदनगर, ४१४००३

ई मेल :-
akshatavadavnikar29@gmail.com

मो. क्रमांक :-
7722015774 / 9511685005 /
9422313487

इयत्ता :- प्रथम वर्ष (बी.एच.एम.एस)
गट क्रं (ब)

सदर निबंध हा स्वलिखित असून स्वहस्ताक्षरात लिहिलेला आहे.

(कु. वडवणीकर अक्षता दत्तात्रय)

या जगामध्ये ज्या वेळेला न्यायाला न्याय आणि सत्याला अभय मिळत नाही त्या वेळेस जनसामान्यांचा आक्रोश हा रस्त्यावरती उमटत असतो म्हणून वामन दादा कर्डक म्हणतात,

"माणसा इथे मी तुझे गीत गावे ,
असे गीत गावे तुझे हीत व्हावे ..."

पण आज एकीकडे माणूस विकासाचे गीत गातो अन् दुसरीकडे दाम पेरणारा तुपाशी खेळतो अन् घाम पेरणारा मात्र उपाशी राहतो हे त्याच्यामधील वास्तव आज सुद्धा बदलायला तयार नाही. आणि मग या वास्तवाचे नकारात्मक परिणाम जेव्हा जेव्हा समाजावरती उमटायला लागतात तसेच स्वातंत्र्याच्या ७४ वर्षांनतर सुद्धा राजधानीच्या सीमेवरती शेतकऱ्यांना आपल्या मागण्यांसाठी वर्षभर ठाण मांडून बसावे लागते, तर संवैधानिक मार्गाने शांततापूर्वक आंदोलन करणाऱ्या उत्तरप्रदेशातील लखीमपूर खेरी येथे मुजोर, अमानवी विकृतीने शेतकऱ्यांना वाहनताफ्याने चिरडून टाकले. एकेकाळी या भारत देशात सोन्याचा धूर निघत होता पण आज त्याच भारतामध्ये शेतकऱ्याच्या सरणाचा धूर निघत आहे. आज अनेक कायदे देशात चर्चेविनाच पारित केले जातात अन् चर्चेविनाच रद्द केले जातात. तर नवी दिल्ली येथे ज्या भारतीय राज्यघटनेने आपल्याला अधिकार दिले त्याच राज्यघटनेला जेव्हा जाळून टाकले जाते किंवा भारतातील एक सिने अभिनेत्री "१९४७ ला स्वातंत्र्य नाही तर भीक मिळाली...." असे म्हणत आपल्या स्वातंत्र्यचळवळीचा अपमान करते तेव्हा खऱ्या अर्थाने आजची स्थिती जातीयव्देष, धर्मांधता, बेरोजगारी, महागाई, अंधश्रद्धा, व्यक्ती स्वातंत्र्याचा गळा दाबून होणारी हत्या या सगळयामुळे चिंतित आहे, आणि आजची निर्माण होणारी अथवा निर्माण केली जाणारी विध्वंसक परिस्थिती केवळ लोकशाहीलाच नव्हे तर संपूर्ण देशाच्या प्रगतीला पोखरणारी वाळवीच ठरते आहे असे वाटते आणि म्हणूनच "भारतीय संविधान आणि आजची परिस्थिती" या विषयावर विचारमंथन करणे यथोचित ठरते.

'भारतीय राज्यघटनेचे ओळखपत्र' असे ज्याचे वर्णन नानी पालखीवाला यांनी केले होते तो संविधानाचा भाग म्हणजे

'सरनामा' होय. या सरनाम्यातून भारताचे स्वरूप, उद्दिष्टे स्पष्ट होतात. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य हे आपल्या भारताचे स्वरूप आहे. तसेच सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता प्राप्त करून देण्याचा निर्धार ही केला आहे. ही 'आम्ही भारताचे लोक' म्हणजेच आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. पण समाजात घडणाऱ्या काही घटनांकडे पाहिल्यास आपल्याला संविधान जागृती करण्याची किती गरज आहे याची जाणीव होते.

आज आपण म्हणतो स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले पण वास्तवाचा जेव्हा विचार करतो तेव्हा मात्र अबला म्हणूनच तिची कुचंबना करतो. पण बाईपणाचे माणूसपण जगणारी स्त्री ही सबलाच आहे. हे तिने संविधानाने दिलेल्या समतेच्या हक्कामुळे (कलम १४, १५ व स्वातंत्र्याच्या कलम १९) मुळे सिद्ध करून दाखवले आहे. चांद्रयान-२ या मोहिमेची धुरा सांभाळणाऱ्या एम. वनिता, रितू करिधल, क्रीडा क्षेत्रात भारताचे नाव उज्ज्वल करणारी मीराबाई चानू, कल्पना चावला यांसारख्या अनेक महिलांनी कर्तृत्व सिद्ध केले आहे. अन् हे केवळ संविधानाने दिलेल्या संधीमुळेच शक्य झाले. पण रणांगणावरती मुर्दुमकी हा पुरूषाचाच प्रांत आहे असे मानून याच पारंपारिक पौरूषाच्या कल्पनांमधून, मानसिकतेतून हाथरस, उन्नाव, निर्भया यांसारख्या अनेक मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना घडतात आणि म्हणूनच 'जागतिक व आर्थिक मंचाने' प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार जागतिक लिंगभाव तफावत निर्देशांक घसरत चालला आहे असे दिसते.

नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांपैकी एक असणारे कर्तव्य म्हणजे स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे होय. मग आजही राजरोसपणे वापरले जाणारे स्त्रियांवरील अपशब्द, काही समाजात केली जाणारी स्त्रियांची कौमार्य चाचणी तर मध्यप्रदेशात अस्तित्वात असणारी कुकडी प्रथा निश्चितच या कलमांच्या, कर्तव्यांच्या म्हणजेच भारतीय राज्यघटनेच्या विरोधातच आहे. असे चित्रण अनेक समाजात दिसून येते.

इन्स्टिट्युट फॉर इकॉनॉमिक्स अँण्ड पीस या संस्थेने २०२३ रोजी जागतिक शांतता निर्देशांक जाहीर केला. या निर्देशांकानुसार १६३ देशांच्या यादीत भारत १३५ व्या स्थानावर आहे. पण आज आपल्या समाजातील अनेक मूल्ये, सहिष्णू संकल्पना, काही नितिमत्तेविषयक संकल्पना यांचे पतन होत आहे की काय ? अशी शंका घेण्यास वाव आहे. कारण काही दिवसांपूर्वीच पालघर येथील गडचिंचले येथे केवळ एका अफवेमुळे दोन साधूंची जमावाने ठेचून झालेली हत्या, पुण्यामध्ये 'मॉब लिंचिंग' अर्थातच झुंडबळी नावाच्या प्रकाराखाली मोहसिन शेख या युवकाची निर्दयीपणे झालेली हत्या. तसेच मध्यप्रदेशातील इंदौर येथे एका बांगड्या विकणाऱ्या तरूणावर केवळ धर्ममुळे झालेला जीव-घेणा हल्ला असो किंवा अखलाक हत्याकांड या घटनांचा डोळसपणे विचार केल्यानंतर सत्यता अशी समोर येते की, संविधानाने भाग-३ मधील (कलम २५ ते २८) या मूलभूत हक्कांमध्ये दिलेला धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क आपण हिरावून घेत आहोत की काय ? असा प्रश्न उपस्थित होऊन त्याचा ऊहापोह करणे काळाची गरज वाटते.

अशी हिंसक, धर्मद्वेष वाढवणारी कृत्ये करणे म्हणजेच घटनात्मक मूल्यांचे हणनचं आहे. धर्माच्या नावाने जे सुडनाट्य उभे केले जाते ते निश्चितच भारताला आणि संविधानाला धोका निर्माण करणारे आहे. झुंडबळी सारख्या घटना घडल्यानंतर आपण मध्ययुगात वावरत आहोत की काय ? अशी शंका निर्माण होते. घटनेतील धर्मनिरपेक्षतेची ही संकल्पना नागरिकांनी नीट समजून घेणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच धर्मावरून राजकारण करण्या-ऐवजी जेथे सर्व जाती-धर्मांचे स्त्री-पुरुष भारतीय या नात्याने एकत्र येऊन बलसागर भारत घडवतील आणि संविधान-कर्त्यांना अन् संविधानाला अभिप्रेत असणारा तो दिवस 'सोनियाचा दिन' असेल.

भारतीय राज्यघटनेच्या भाग-४ ए मधील मूलभूत कर्तव्यांच्या प्रकरणात अनुच्छेद ५१-ए मधे आठव्या

क्रमांकाचे कर्तव्य आहे की, 'वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद, जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.' भारताने मंगलयान, चांद्रयान सारख्या मोहिमा यशस्वी केल्या अन् अवकाश क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादित केले. पण दुसऱ्याच बाजूला जेव्हा बायकोच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण होऊन तिला उकळत्या तेलातील नाणे काढायला लावणे, अनेक भोंदूबाबांच्या कच्छपी लागणे, नरबळी देणे, देवाला कौल लावणे, नवस करणे अशा पारंपरिक प्रथा आहे. याचाच अर्थ असा की, आम्ही या विज्ञान युगात विज्ञानाची करणी स्वीकारली मात्र विज्ञानाची विचारसरणी आम्ही स्वीकारली नाही. देवाला नवस केला की आपली इच्छा पूर्ण होते असे मानले जाते पण संत तुकाराम म्हणतात.

"नवसे कन्या पुत्र होती, मग का करणे लागे पती"

हा वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारण्याची जबाबदारी भारतीय संविधानाने कर्तव्यांच्या माध्यमांतून आपल्यावर सोपविली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात अस्पृश्यते सारख्या माणसाला माणूसपण नाकारणाऱ्या रूढी-परंपरा अस्तित्वात होत्या. हजारो वर्षांपासून असलेले गुलामगिरीचे जोखड फेकून देण्याचे कार्य भारतीय संविधानाने केले. ज्यांच्या पिढ्यानपिढ्या गुलामीत आणि सलामीत गेल्या त्यांना मानवी हक्क, समानता मिळवून देण्यासाठी कलम १४, १५, १६, १७ संविधानात आहे. कलम १७ मध्ये अस्पृश्यता नष्ट करणे असा स्पष्ट उल्लेख असूनही जातीप्रथेने भारतीय समाजाची नवे काही तरी करून दाखविण्याची उर्मी मारली. कारण आजच्या परिस्थितीचा आपण विविधांगी विचार करतो तेव्हा मात्र राजस्थानात मंदिरात गेल्यामुळे एका तरुणावर जातीच्या कारणामुळे झालेला हल्ला असो अथवा उत्तरप्रदेशात मिशी वाढवल्यामुळे तरुणाला झालेली मारहाण असो तर भटकंती करत फिरणारा, आधारकार्ड, रेशनकार्ड यापासून मैलोन् मैल दूर असणारा भटका समाज आजही सामाजिक विचारप्रक्रियेपासून आणि

विकासाच्या प्रवाहापासून दूरच आहे. जातीप्रथेने आपल्या समाजातले चैतन्य आणि क्रियाशिलतेचा अंत केला असे वाटते. खरे तर जातीप्रथेच्या बंदिस्त व अपरिवर्तनीय स्वरूपाने सर्वच भारतीय समाजाचे मोठे नुकसान झालेले दिसते. राज्यघटनेचे राखणदार ही भूमिका निभावताना कोणत्याही विवेकी माणसाला 'जातीअंताचा' विचार करणे क्रमप्राप्त आहे.

तसेच आजच्या परिस्थितीचा गांभीर्यपूर्वक विचार, चिंतन केले तर अनेक युवकांची हातात डिग्री, काखेत डिग्री काम नाही की धंदा नाही अन् बेकारीच्या सरणावरती आमचे प्रेत जळतही नाही अन् धुपत ही नाही. अशी दुहेरी अवस्था झाली आहे. एकूणच बेरोजगारी हे आपल्या लोकशाही पुढील मोठे आव्हान आहे. एव्हाना दिवसेंदिवस आर्थिक विषमता देखील वाढीस लागली आहे.

मानवी हक्कविषयक किती ही जाहीरनामे प्रस्तुत केले, राज्यघटनेत किती ही तरतुदी केल्या, कितीही करार केले मात्र हे सगळे जनमानसात रूजलेच नाही तर त्याला अर्थ प्राप्त होणारच नाही. ऑक्टोबर २०२३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या जागतिक भूक निर्देशांकात जगातील १२६ देशांत भारत १०१ क्रमांकावर आहे. म्हणजे ही विषमता देखील कमी करणे गरजेचे आहे. जागतिक प्रसारमाध्यम स्वातंत्र्य या निर्देशांकानुसार भारत १४२ व्या स्थानी आहे. मानव विकास निर्देशांकानुसार भारताचे १३१ वे स्थान आहे. तसेच भारताचा लोकशाही निर्देशांक देखील घसरत चालला आहे. या अन् अश्या निर्देशांका मध्ये आपले स्थान सुधारणे हे आव्हान देखील आ वासून उभे आहे.

अर्थातच आपण स्वातंत्र्यानंतर सर्वच क्षेत्रात उज्ज्वल, दैदिप्यमान प्रगती केली यात शंका नाही पण तरीही अजून दीर्घ पल्ला गाठावा लागणार आहे हे ही तितकेच सत्य आहे.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान सभेतील शेवटच्या भाषणातील काही वचने उद्धृत करावीशी वाटतात. ते म्हणतात, "माझ्या मते,

संविधान कितीही चांगले असो, ते राबवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहत नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही.

यासाठी राज्यकर्त्यांनी तसेच नागरी समाजाने प्रयत्न-पूर्वक संविधानिक मूल्ये रुजविली तरच हे चित्रण बदलेल हे नक्की !